**<u>ठळक बातम्या</u>**

- एआय इम्पॅक्ट समिट हे कृत्रिम बुद्धिमत्तेचा जगभरात उपयोग करण्याच्या दिशेने महत्त्वाचं वळण ठरल्याचं, प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत, वॉशिंग्टन इथं होणाऱ्या वाटाघाटींचं वेळापत्रक, पुन्हा आखण्याचा दोन्ही देशांचा निर्णय

- महाराष्ट्र विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून

- मुंबईत एआय फॉर ॲग्री ही जागतिक परिषद सुरु

- महिला क्रिकेटमध्ये, आशिया चषक रायझिंग स्टार्स २०२६ स्पर्धेचं जेतेपद भारताच्या अ संघानं पटकावलं

**आणि**

- टी ट्वेंटी विश्व चषक स्पर्धेत भारताबरोबरच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना खराब सुरुवातीनंतर दक्षिण अफ्रिकेची फटकेबाजी

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं नुकतीच झालेली इंडिया एआय इम्पॅक्ट समिट ही आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग जगभरात कसा केला जाईल, या दिशेनं एक महत्त्वाचं वळण ठरल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १३१ वा भाग होता. या परिषदेत अमूलच्या बूथवरचं प्राण्यांवर उपचार आणि देखरेखीसाठीचं कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपकरण तसंच आपले प्राचीन ग्रंथ, प्राचीन ज्ञान आणि आपल्या हस्तलिखितांच्या जतनासंदर्भातलं ॲप्लिकेशन, या भारताच्या दोन उत्पादनांनी जगभरातील नेत्यांना प्रभावित केल्याचं त्यांनी

सांगितलं. या शिखर परिषदेत संपूर्ण जगाला भारताची कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील अद्भुत क्षमता पाहायला मिळाली असं ते म्हणाले. या शिखर परिषदेत तरुणांचा उत्साहवर्धक सहभाग पाहायला मिळाल्याचं ते म्हणाले.

देशात अवयवदानाविषयीची जागरूकता सातत्यानं वाढत असल्याचं त्यांनी नमूद केलं. यासंदर्भात अलीकडेच केरळमध्ये अवघ्या दहा महिन्यांच्या आलिन हिचा मृत्यू झाल्यानंतर तिच्या पालकांनी आलिनच्या अवयवदानाचा निर्णय घेतल्याची घटना त्यांनी श्रोत्यांना सांगितली. अवयवदानामुळे गरजूंना नवं आयुष्य मिळाल्याची देशभरातली अनेक उदाहरणं त्यांनी आज श्रोत्यांसमोर मांडली.

खेळ आपल्याला परस्परांशी जोडतात असं त्यांनी सांगितलं. सध्या सुरू असलेल्या टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचा उल्लेख त्यांनी केला. या स्पर्धेत अनेक देशांच्या संघात मूळ भारतीय वंशाचे खेळाडू असल्याचा संदर्भ त्यांनी दिला. भारतीय कुठेही गेले तरी आपल्या मातृभूमीशी जोडलेले राहतात असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - MKB MODI BAHRTIYA VANSH**

ऑनलाईन फसवणुकीबद्दलही त्यांनी संवाद साधला. डिजिटल अरेस्ट विषयी देशात जागरूकता वाढली असली, तरी आजही अशी प्रकरणं घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर याबाबतीत सगळ्यांनी सतर्क राहण्याचं आवाहन त्यांनी केलं.

आपले शेतकरी केवळ अन्नदाता नाहीत, तर ते आपल्या भूमीचे खरे साधक आहेत. ते पारंपरिक पद्धत आणि तंत्रज्ञानाच्या सोबतीनं वाटचाल करत आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले. आपले शेतकरी केवळ उत्पादनावरच नाही, तर गुणवत्ता, मूल्यवर्धन आणि नव्या बाजारांवरही लक्ष देत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी  यांनी आज उत्तर प्रदेशात नमो भारत ट्रेन आणि मीरत मेट्रो सेवेचं उद्घाटन केलं. प्रधानमंत्री मोदी आणि उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी

आदित्यनाथ यांनी यावेळी मेट्रोमधून प्रवासही केला. १८० किलोमीटर प्रति तास वेगानं धावणारी नमो भारत ट्रेन देशातली पहिली जलद वाहतूक प्रणाली आहे. त्याचप्रमाणे मिरत मेट्रो ही ताशी १२० किलोमीटर वेगानं धावणारी सर्वात जलद मेट्रो आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांनी ८२ किलोमीटरच्या दिल्ली-मिरत नमो भारत कॉरीडरचं लोकार्पण केलं. याशिवाय प्रधानमंत्र्यांनी १२ हजार ९३० कोटी रुपयांच्या विकासकामांचं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत होणाऱ्या वाटाघाटींचं वेळापत्रक पुन्हा आखण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतला आहे.

**आता** अमेरिकेच्या व्यापार धोरणावरून नुकत्याच झालेल्या घडामोडी आणि त्याचे परिणाम, यांचं दोन्ही देश मूल्यांकन करतील, आणि त्यानंतर भारतीय शिष्टमंडळाची अमेरिका भेट निश्चित केली जाईल, असं वाणिज्य मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून मुंबईत सुरु होत आहे. या अधिवेशनाच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज आयोजित वार्ताहर परिषदेत सांगितलं. हे अधिवेशन चार आठवड्यांचं **अधिवेश**न असेल. ६ मार्चला अर्थसंकल्प मांडणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

केंद्रीय अर्थसंकल्पातून राज्याला भरीव आर्थिक मदत मिळाली असून त्यामुळे राज्याच्या विकासाला गती मिळणार असल्याचा विश्वास फडनवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधारी पक्षानं आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला.

**<><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर केला तर भारताचं कृषी क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेत ७० हजार कोटी रुपयांचं योगदान देऊ शकतं, असा विश्वास केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत आयोजित एआय फॉर ॲग्री या कृषी क्षेत्रातल्या कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक जागतिक परिषद आणि आणि गुंतवणूकदार शिखर संमेलनात बोलत होते. महाराष्ट्रानं जाहीर केलेली स्वतंत्र ‘अॅग्री एआय पॉलिसी’ स्वागतार्ह असून इतर राज्यांनीही त्याचं अनुकरण करावं, असे आवाहन त्यांनी केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या परिषदेचं उद्घाटन केलं. सर्वसमावेशकता, पारदर्शकतेसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करणं हे एआय मिशनचं उद्दिष्ट आहे, याचाच अवलंब कृषी क्षेत्रात करण्याचा सरकारचा प्रयत्न असून कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक एआय धोरण राबवण्याचा निर्णय घेणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

एक  स्टेप फाउंडेशन आणि जागतिक बँक यांच्याशी महत्वपूर्ण त्रिपक्षीय सामंजस्य करार यावेळी करण्यात आला.

**<><><><>**

महिला क्रिकेटमध्ये भारताच्या अ संघानं बँकॉक इथं झालेल्या आशिया चषक रायझिंग स्टार्स २०२६ स्पर्धेच्या अंतिम सामन्यात बांग्लादेश अ संघावर ४६ धावांनी मात करत जेतेपद पटकावलं. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताच्या अ संघानं ७ गडी गमावून १३५ धावा केल्या. तेजल हसबनीसनं नाबाद ५१ धावा केल्या. भारताच्या धावसंख्येचा पाठलाग करताना बांगलादेश अ संघाचा डाव १९ व्या षटकात ८८ धावांतच आटोपला. प्रेमा रावनं तीन बळी घेतले.

तेजल हसबनीस सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**<><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेच्या सुपर एट मधे आज अहमदाबाद इथं भारत आणि दक्षिण अफ्रिका यांचा सामना सुरु आहे. दक्षिण अफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. त्यांची सुरुवात खराब झाली. मात्र डेवाल्ड ब्रेविस आणि डेविड मिलर यांनी चौथ्या गड्यासाठी ९७ धावांची भागिदारी करत डाव सावरला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण अफ्रिकेच्या १९ षटकात ६ बाद १६७ धावा झाल्या होत्या. आज पल्लेकेले इथं झालेल्या सामन्यात इंग्लडनं श्रीलंकेवर ५१ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लडनं ९ गडी गमावून १४६ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ १६ षटकं आणि ४ चेंडूतच ९५ धावात गारद झाला.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या किश्तवार जिल्ह्याच्या दुर्गम भागात आज सकाळी सुरक्षा दलांनी राबवलेल्या ‘ऑपरेशन त्राशी-१’ अंतर्गत झालेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले. गुप्तचर विभागाकडून जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंधित दोन पाकिस्तानी दहशतवादी लपून बसल्याची माहिती मिळाल्यावर लष्कर, जम्मू-काश्मीर पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दलानं संयुक्तपणे ही मोहीम राबवली. या कारवाईत दोन AK-47 रायफल्ससह मोठ्या प्रमाणात शस्त्र साठा जप्त करण्यात आल्याचं सुरक्षा दलांच्या सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

दिल्ली पोलिसांनी पाकिस्तान पुरस्कृत लष्कर-ए-तय्यबा या दहशतवादी संघटनेचा एक कट उघडकीला आणला असून, कोलकाता आणि तामिळनाडूमध्ये एकाच वेळी केलेल्या कारवाईत ८ जणांना अटक केली आहे. अटक झालेल्यांमध्ये ७ बांगलादेशी नागरिक आहेत, तर एक जण पश्चिम बंगालचा रहिवासी आहे. या कटाचा सूत्रधार बांगलादेशातून कार्यरत होता. या प्रकरणी पुढला तपास सुरु आहे.

**//<><><><><>//**